# महसूल विषयक काही संकल्पना/जुने शब्द

| | |
|---|---|
| १) | **गांव**<br><br>पुराणामध्ये गावाची व्याख्या अशी दिलेली आहे :<br><br>" तथाशुद्र जनप्राया सुसमृध्दकृषीवला<br>क्षेत्रोपभोगभूमध्ये वसतिर्ग्रामसंज्ञिता!!"<br><br>जिच्याभोवती कीर्दसार वहीतील योग्य जमीन आहे व जिच्यामध्ये मातब्बर शेतकरी व पूष्कळसे मजूर आहे अशा वस्तीला गाव म्हणबाबत. |
| २) | **शिव**<br><br>गावाच्या हद्दीला किंवा सिमेला शीव ही संज्ञा आहे. |
| ३) | **पांढरी**<br><br>पूर्वीच्या काळी गावठाण असतांना काळया मातीच्या जमीनीमध्ये घर बांधायला धर सापडत नसल्यामुळे शक्यतो पांढऱ्या जमीनीची योजना गावठाणाकडे झालेली दिसते. अशाप्रकारे गावाच्या विशेषतः पांढऱ्या जमीनीवर माणसे घरदार करुन नांदतात. तीला पांढरी, आहे-वांढर किंवा गावठाण म्हणतात. पांढरी ही संज्ञा जमीनीचा रंग व गुणधर्मावरुन प्रचारात आली असावी. पांढरी जमीन पांढरसर आवळ, निबळ असून तिच्यामधून पाणी वाहून जाते. |
| ४) | **काळी**<br><br>काळी जमीन भुसभुशीत व सूपिक असते. ही जमीन पिके घेण्यासाठी अतिशय अपयुक्त असते. रंगावरुन व गुणधर्मावरुन शेतीवाडीकडे वापरण्यांत आलेली गावातील जमीन ही मुख्यतः काळी असते. तीला काळी, काळी आई, रान किंवा शिवार म्हणतात. गावठाण जमीनीमध्ये व काळया जमीनीमध्ये जमीनीवर द्यावा लागणारा कर सुध्दा या जमीनीच्या आधारे ओळखला जाऊ लागला. उदा. मी ५ रुपये काळी देतो याचा अर्थ माझ्या शेत जमीनीबद्दल मी ५ रुपये कर सरकारला देतो असा होतो. त्यामुळे पांढरी म्हणजे गाव किंवा लोकवस्ती व काळी म्हणून शेतकरी वर्ग असा भाषा प्रयोग वापरला जातो. |
| ५) | **शिवार**<br><br>पांढरी व्यतिरिक्त गावाच्या शिवेच्या आतील सर्व भूभाग - शेते, खराबा, चराई, नद्या, नाले, मसणवाडा, माळमुरडत इत्यादी शिवार या शब्दामध्ये समाविष्ठ होतात. गावठाणापासून लांबची जमीन शेतकरी जसजशी कसू लागले, तसतसे शेतामध्ये जाणे-येणे शेतकऱ्यांना त्रासदायक होत गेले. कालांतराने गावठाणाच्या बाहेर व शेतीच्या जवळ कायमची वस्ती करुन लोक राहू लागले. अशाप्रकारे शेतात १-२ घरे असली तर त्यांना झाप, आवसा, कोठा, गोठा किंवा पडाळ (पर+आलय) असे म्हणतात. |
| ६) | **वाडी किंवा वस्ती**<br><br>शेत जमीनीमध्ये राहणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या हळूहळू वाढत गेली. अशाप्रकारे शेत जमीनीमध्ये ५-१० शेतकरी समुहाने एकत्र राहू लागले व त्यांचेसुध्दा एक छोटेखानी गावठाणच तयार झाले. त्याला वाडा, वाडी, वजरे किंवा पाडा असे नांव प्राप्त झाले. कागदोपत्री अमुक गावच्या अमुक वाडी किंवा वजरे असा उल्लेख केलेला आढळतो. |

| | |
|---|---|
| ७) | **मौजे गाव**<br>कमी वाडया असणारे व कसबे गावापेक्षा छोटे असणाऱ्या गावाला मौजे गाव असे म्हणतात. |
| ८) | **कसबा**<br>कसब (कला अगर हुन्नर) या शब्दापासून कसबा हा शब्द निघाला आहे. व्यापार, हुन्नर व कसबी मजूरी करणारे लोक ज्या गावामध्ये जास्त असतात व वाडयांची संख्यासुध्दा जास्त असते त्याला कसबे गाव असे म्हणतात. मौजे गावापेक्षा कसबे गाव हे जास्त विस्तृत चव्हाटयाचे व रोजगाराच्या दृष्टीने व व्यापाराच्या दृष्टीने संपन्न असते. नागरीकरणाकडे १९ व्या शतकाच्या शेवटी झुकलेली गांवे म्हणजे कसबे होय. |
| ९) | **पेठ**<br>मोठया व्यापाराच्या गावाला पेठ असे म्हणतात. पेठ म्हणजे बाजार किंवादुकानांनी व्यापलेला भाग. |
| १०) | **खेडे**<br>खेडणे म्हणजे जमीन कसणे व खेडो म्हणजे जमीन कसणारा. तेव्हा खेडूंची जी वस्ती असते ते खेडे. गावातील मुख्य व्यवसाय शेती असेल व वस्ती मुख्यत: शेतकऱ्याची असेल त्या गावाला खेडे किंवा गावडे असे म्हणतात. इतर गावांना शहर मानतात. |
| ११) | **वेस**<br>गावाच्या बंदोबस्तासाठी घाटावरील पुष्कळ गावासभोवती गावकूस किंवा कोट केलेला असतो. त्यामध्ये गावात शिरण्यासाठी एक अगर अधिक वेशी असतात. |
| १२) | **लक्ष्मी**<br>गाय, म्हशी, बैल, रेडे इत्यादी शेतोपयोगी जनावरांना लक्ष्मी म्हणतात. उदा. पाटलाजवळ दोन खंडी लक्ष्मी आहे किंवा रानात लक्ष्मीला पाणी मिळत नाही असा उल्लेख आढळतो. |
| १३) | **कुणबी**<br>उद्योगाप्रमाणे लोकवस्तीची वेगवेगळे भाग शेतकरी करतात. त्यातील कुणबी म्हणजे शेतकरी व अडाणी म्हणजे बिगर शेतकरी. कुळव, कुणबी हे शब्द कूळ या शब्दापासून निघाले असावेत. द्राविडी भाषेमध्ये जमीन कसणाऱ्याला पूर्वी "कूळ" म्हणत. |
| १४) | **बळीराजा**<br>खेडयातील सर्वधंदेवाले कुणब्याला म्हणजे शेती करणाऱ्याला बळीराजा असे म्हणत. कदाचित शेतीमूळे शारिरीक बल प्राप्त होते व  त्यावरुन बळी (बलवान) म्हणण्याचा रिवाज ठरविला असावा. |
| १५) | **पांढरपेशे**<br>ज्या धंदयाचा काळया जमीनीशी, शेत जमीनीशी म्हणजेच काळीशी निकटचा संबंध नाही त्या कसणाऱ्यांना पांढरपेशे म्हणतात. |
| १६) | **शष्टांश वृत्ती**<br>रयतेच्या उत्पन्नातील सहावा हिस्सा राजाने घ्यावा अशी वेदांपासून पध्दत आहे व त्या वरुन सहावा हिस्सा तो सरसकट धारा म्हणून किंवा कर म्हणून ठरविण्यांत आला. तो राजा जात असल्यामुळे शष्टांश म्हणजे राजाचा प्रतिशब्द मानला गेला. |

| | |
|---|---|
| १७) | **संदर्भ**<br><br>**पुराणामध्ये गावाची व्याख्या खालीलप्रमाणे दिली आहे.**<br>१. राजाने रयतेच्या उत्पन्नाचा ६ वा हिस्सा भाग देय करिता म्हणून द्यावा. या संदर्भात "धान्यानामष्टमो भाग, ष्ठठो द्वादश एक वा आददीत" असा उल्लेख मनुस्मृतीमध्ये आहे व त्यावरुन संस्कृतमध्ये षष्टांशवृत्ती हा राजाचा प्रतिशब्द तयार झाला.<br>२. मुसलमानी रियासतीमध्ये "खलक खुदाका मुलक बादशहाका (विश्व परमेश्वराचे आणि मुलुख राजाचा), बेटी बापाची जमीन बादशहाची अशी म्हण पडली.<br>३. अकबर बादशहाच्या कारकिर्दीत राजा तोडरमल याने "इलाहीगज" नावाची जमीन मोजणीप्रमाणे निश्चित करुन जमीनीचे वर्गीकरण व वसूली आकारणी केली. या वसूल पध्दतीला दक्षिणेमध्ये तनखा असे म्हणतात. पूर्वी तांब्याचा टक्का वसूली म्हणून घेत होते, त्याऐवजी रुप्याचे तनखा नाणे घ्यावयाचे. त्यामुळे याला तनखा असे नांव पडले.<br>४. इ.स. १६०७ ते १६२६ च्या दरम्यान निजामशाही मधील सुप्रसिध्द मुत्सद्दी व चांदबीबीचा नोकर मलिकंबर यांने दक्षिणेची शेतवार पाहणी व मोजणी करुन प्रतवारी बसविली व जमीनीच्या उत्पन्नाप्रमाणे २/५ हिस्सा घासदाव्याच्या रुपाने वसूल घेण्याचा खुद्द गावाशी करार केला व वसूलीची जबाबदारी पाटलावर टाकली.<br>५. नंतरच्या काळात उत्पन्नाच्या १/३ वसूल करण्याची पध्दत सुरु झाली व कुणब्यांना मिरासपत्रे देऊन जमीनीचे मालक बनवून त्यांना खरेदी विक्रीचे हक्क दिले. पाटील, कुलकर्णी व इतर बलुतेदार यांची वतने मिरास वंशपरंपरेची करुन दिली. मलिकंबरने गावापैकी पड जमीन, वन चराई, गायरान म्हणून वेगळी काढून दिली व उरलेली जमीन व गावासंबंधी किंवा गाव वर्दळ म्हणून गावाच्या दिमतीला लाऊन दिली. ही वसूली पध्दतीची सुधारणा "मलिकंबरी तह" या नावाने प्रसिध्द आहे.<br>६. रुप्याचे तनखा गावाचे नाणे घेऊन कूकाकडे किंवा गावाकडे असलेल्या जमीनीला मिराशी व तिचा भोगवटा करणाच्यास मिरासदार किंवा वतनदार असेम्हणत. मेलेल्या माणसाची जी मिळकत त्याचया वारसाला प्राप्त होते तिला अंखणी भाषेमध्ये मिरास असे म्हणतात. अशाप्रकारे वारस हक्काने पिढयानपिढया अधाधीत राहणाऱ्या जमीनीला मिराशी म्हणत असत. मिराशीच्या कोकणी भावंडाना सूटी व धरा असे म्हणतात.<br>७. मिराशी सोडून जी किर्दसार जमीन सरकारच्या वहीवाटीला राहिल तिला खालसा असे म्हणतात. |
| १८) | **वतन**<br><br>वतन हा शब्द वर्तन (उपजिविकेचे साधन या संस्कृत शब्दापासून निघाला) राहण्याच्या जागेला अरबी भाषेत वतन असे म्हणतात. जात, धंदा, वंशपरंपरागत काम, चाकरी, उत्पन्न, अधिकार, मानपान, हक्क, वडीलोपार्जित मिळकत, स्थावर व स्थावरच्या योग्यतेची जंगम मालमत्ता, जन्मभूमी या सर्वांना वतन शब्द लागतो. वतन धारण करणारा तो वतनदार. गावच्या वसूलीवर, पिकावर, हरजिनसावर, देऊळ-दर्ग्यासारख्या धर्मादायावर किंवा गावकऱ्यांच्या संस्कारावर,जिचा पिढयानपिढया अगर व्यक्तीविशिष्ठ, निरंतर किंवा काही काळापर्यंत हक्कात आहे, ते सर्व वतनदार होत. ज्या गावी जो कायमची वस्ती करुन राहतो, जमीननुमला करतो, किंवा कामविशेष धंदयानिमित्त अगर भिक्षेनिमित्त फेऱ्या घालतो तो सुध्दा वतनदार होय. |
| १९) | **गावगाडा**<br><br>वतनदार गावासंबंधीचे परस्पर व्यवहाराला आणि वतनदाराच्या जगद्व्यापी जाळयात गुरफटले. गावाच्या सामायिक अंतरबाहय व्यवहाराला "गावकी" किंवा "गावगाडा" असे म्हणतात. |
| २०) | **ग्रास**<br><br>संबंध राज्य संस्थान किंवा सरदारकी, वडील मुलाला म्हणजे थोरल्या मुलाला मिळत असे. त्या धाकटया मुलाचा इतमाम चालविण्यासाठी जो ऐवज देत त्यास ग्रास असे म्हणत. |

| | |
|---|---|
| २१) | **थोडा ग्रास**<br><br>१९ व्या शतकाच्या आरंभी बंडखोर रजपूत व कोळी, नाईक यांनी गुजरातमध्ये गावेच्या गावे लुटण्याचा प्रयत्न केला आणि सरकारकडून तर रयतेचे रक्षण होईना. अशा गावांनी त्यांना थोडा ग्रास गावाची खंडणी द्यावयाचे ठरविले व त्यांनीही गावाला उपद्रव न देण्याचे व दुसरे कोणी लुटारु गावात आल्यास त्यांचा बंदोबस्त करण्याचे पत्करले. |
| २२) | **राज्याचे विभाग**<br><br>मोठे सरकार, त्यामध्ये परगणा, त्याच्या आत कर्यात, तिच्या पोटी समंत, तिच्यामध्ये महाल, त्याच्या आंत तालुका अशी दक्षिणेतील मुसलमानी राज्यात मुलखांची नांवे होती. मराठेशाहीत सुमारे ६० पर्यंत गांवे मिळून तरफ, १५० ते २०० गावे म्हणजे महाल किंवा परगणा (२ ते ४ तरफा) व काही परगणे मिळून सुभा याप्रमाणे राज्याचे विभाग केले होते. पोतनवीसाकडे प्रांताचे नगदीचे हिशोब असत. फडणविसाकडे सर्व दप्तर असे. |
| २३) | **वतनाचे प्रकार**<br><br>वतनांना देशपरत्वे व जातीपरत्वे निरनिराळी नावे पडली. उपयोगाच्या दृष्टीने इंग्रज सरकारने वतनाचे ३ वर्ग केले. (१) सरकार उपयोगी (२) रयत उपयोगी (३) सरकार व रयत या दोघांनाही निरुपयोगी.<br><br>(१) **सरकार उपयोगी** : पाटील, राव, खोत, गावडा, गावकर, नाईक, मुकादर इत्यादी तसेच कुलकर्णी, पांडया कर्णिक चौगुला इ.<br><br>(२) **रयत उपयोगी** : जोशी, गुरव, जंगम, काझी, सुतार, लोहार, चांभार इ.<br><br>(३) **सरकार व रयत या दोघांना निरुपयोगी** : सोनार, शिंपी, तेली, माळी, नाशिक, तांबोळी, गवंडी, कासार, इ. |
| २४) | **गाव मुकादम**<br><br>मोकदम हा किताब पाटलाला असे. पाटील चौगुल्याखेरीज सोनार, शेटे, माळी इत्यादी वतनदारांना बाजे वतनदार म्हणत. बाज म्हणजे संपादन केलेले गुणी. त्यामुळे गावचे सर्वश्रेष्ठ वतनदार गाव मुकादम या सदराखाली मोडत. |
| २५) | **पटवारी व कुलकर्णी**<br><br>पाटलाला गावाची कामे करण्यासाठी लिहिण्याची आवश्यकता पडे, गावचे सर्व हिशोब चोख ठेवण्यासाठी लिहिता येणे त्याला आवश्यक होते. तरी बहुसंख्य पाटलांना लिहिता येत नसे. त्यामुळे त्याला लेखक मदतनीस ठेवणे आवश्यक झाले. त्याला स्थलपरत्वे पटवारी, कुलकर्णी किंवा पांडया असे म्हणत. पट म्हणजे इतार पट (गावाचा मुख्य हिशोबी कागद) करणारा तो पटवारी, किंवा कुळे करणारा म्हणजे कुळवार, गावाचा हिशोब लिहिणारा तो कुलकर्णी. हा शब्द बहुधा दक्षिण हिंदुस्थानातून उत्तरेकडे आला असावा. कारण द्राविडी भाषेत शेतकऱ्याला "कूल" व कुलकर्ण्याला "करणं" असे म्हणत. पांडया हा पंडीत शब्दाचा अपभ्रंश आहे. कुलकर्णी हा पाटलाचा हिशोबनिस आहे. कूळ, करणं, वतन सुमारे १००० वर्षाचे जुने आहे असे सांगतात. कुलकर्णी हा गावच्या दप्तराचे सर्व काम करतो. शिवाराचे कमाल क्षेत्र, आकार व वर्णन यांचा आकारबंद, शेतवारपत्रक, लावणीपत्र, पडपत्रक, सरकारी देण्याचे असामीवार, वसूलबाकीपत्रक व त्याची बाबवार फाळणी आणि जमाखर्च, गुरांची व माणसांची गणती वगेरे मुलकी कागदपत्र दिवाणी कामातील पंचायतीचे सारांश व फेसलनामे, फौजदारी कामाचे कागद वगैरे लेखी कामे कुलकर्णी करी. गावकऱ्यांची पत्रे, देण्याघेण्याचे दस्तऐवज, पावत्या व त्यांचे सावकारी सरकारी देण्याचे जमाखर्च, हेही लिहिण्याचे कामे तो करी. |

२६)

## बेगार : (बे-कार)

जे काम करणाऱ्याला अभ्यास, कला किंवा विशेष असे ध्यान नको त्याला बेगार असे म्हणतात. रोख मेहनतान्यावाचून करावो लागते त्या कामाला तेलंगणामध्ये "वेट्टी" म्हणतात. तेव्हा हया शब्दापासून "वेठ" हा शब्द निघाला असावा. गावगाडयाचा खराखुरा वेठ-बिगारी व हरकाम्या महार होते.

२७)

## जमाबंदी

स्वराज्यामध्ये हिशोबी साल फसली व त्याचा आरंभ मृग नक्षत्र निघाल्याच्या दिवसापासून होतो. दरवर्षी वर्षारंभी हुजुरातून मामलेदारांना खालसा महालाबद्दल "आजमास" अथवा (नेमणूक बेहेडा" देत. या हया कागदामध्ये एकंदर महालाचा कमाल आकार करुन त्यामध्ये दुमाले गाव, जमीनीवरील आकार वजा करुन निव्वळ ऐन जमा आकार आकारत. पावसाळयाच्या सुरुवातीला मामलेदार पाठलाला बोलावून घेत व त्याच्याकडून वसूलाचा इकरार करुन घेत. गावी परत आल्यावर पाटील रयतेला लागण करण्यास मदत करी. नडलेल्या कुळांस मामलेदाराकडून तगाई व सावकाराकडून कर्ज मिळवून देई व तसेच जुने देणे तहकूब करण्यासाठी मध्यस्थी करी. पिके आकाराला आली म्हणून मामलेदार पाहणीला निघत व गावोगावचे लोकांच्या तक्रारीवर न्याय करीत. शेतकरी आणि वतनदार यांची सूट किंवा तहकूबीबाबतचे म्हणणे विचारात घेत व जमाबंदीचा ठराव करीत. पाटलाने तो मान्य केला की त्याला कबुला-कितबा देत. कोणी किती पट्टी द्यावयाची याबद्दलचा पाटलाचा व रयतेचा ठराव पूर्वीच झालेला असे. मामलेदारांनी तो कबूल केला नाहीतर पाटील पुन्हा रयतेचा विचार मामलेदारांना कळवित. दोघांचे एकमत झाले नाहीतर मामलेदार बटाई ठरवित. अर्धे उत्पन्न कुळांना द्यावयाचे व अर्धे सरकारला ठेवित. काही ठिकाणी क्षेत्रातील तर कोठे नांगरांच्या संख्येवर महसूल ठरविला जात असे. तो पूर्वीची जमाबंदी म्हणजे एका बाजुला सरकारतर्फे मामलेदार व दुसऱ्या बाजुला रयतेतर्फे पाटील, देशमुख, कुलकर्णी यामध्ये देवाणघेवाणीचा सौदा होत होता. जमाबंदी मुक्रर होईपर्यंत गावची पिके हवालदाराच्या जाबत्यात असत. ज्यांच्याकडे बाकी राहिल ती चुकवेपर्यंत महसूली शिपाई तगादा करी, चावडीत कोंडी, त्याच्या डोक्यावर धोंडा देई, त्याच्या चुलीत पाणी ओती व त्याचा दाणापाणी बंद करी. म्हणजेच त्याला नदी, विहिरीवर पाण्याला जाऊ देत नसे. एवढयाने पण तो वठणीवर आला नाहीवर मामलेदाराकडे पाठवीत. मामलेदार त्याला कैद करी, त्याची गुरेढोरे वगैरे जंगम मालमत्ता विकी. पण ती विकतांना त्याला खाण्यापिण्याला राखून ठेवी व स्थावर विकत नसे. गावाच्या सरकार देण्याची हमी गावावर असल्यामुळे काही कुळे पदागंदा झाली तरी त्यांच्याकडील बाकी चुकवावी लागे. क्वचित प्रसंगी गावकऱ्यांना ओलीस धरत. तेव्हा गावकरी व पाटील कुळाची जमीन विकून बाकी चूकवीत असत. संबंध गावाने पट्टी दिली नाहीतर गावावर स्वार दवडण्यांत येई. "शिलकावणे" (जाच्याकडे तगाद्याला शिपाई पाठवावयाचा त्याच्याकडून त्याची पोटगी घेणे) बसविण्यात येई. एवढयाने भागले नाहीतर कुळाला सर्व यातना भोगाव्या लागत. त्यामुळे गावाच्या मुलकी कामांच्या सुखदुखाचा पूर्ण अधिकारी पाटील हा होता.

मुलकीप्रमाणेच फोजदारी अधिकारही पाटलाला होते. या कामात त्याला मुख्य मदत जागल्याची असे व त्याचा वरिष्ठ मामलेदार हाच होता.

२८)

## महाराष्ट्रातील न्याय पध्दती

धुळयाचे रा.रा.भट हयांच्या मते सुमारे तेराशे वर्षापासून दिवाणी, फौजदारी व्यवहारांचा निर्णय करणाऱ्या महाराष्ट्रीय संस्था गोत, देशक, न्यायाधीश व राजा हया होत्या. गोत म्हणजे गावातील निरनिराळया जातींच्या व धंद्यांच्या लोकांची सभा. ती सर्व जातीच्या लोकांच्या गावकी स्वरुपाच्या वादाचा निवाडा करी व पाटील वगैरे अधिकाऱ्यामार्फतच तिच्याकडे फिर्याद आली पाहिजे असा निर्बंध नसे. तिच्या निवाडयास थळपत्र, गोतपत्र, किंवा गोत-महजर म्हणत. गोताने दिलेल्या निवाडयाचा पुन्हा निर्णय करण्याचा व प्रांतिक स्वरुपाच्या व्यवहाराच्या निर्णय करण्याचा अधिकार देशकास असे, आणि त्याच्या निवाडयास देशकाचा किंवा परगण्याचा महजर म्हणत. गोत व देशक हयांच्या वरिष्ठ न्यायाधीश व राजा हे होते.